**प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत सार्वजनिक-खाजगी भागीदारी (PPP) तत्वावरील प्रकल्पांसाठी केंद्र सरकारने निर्गमित केलेल्या प्रतिकृतीची (Model) राज्यात अंमलबजावणी करण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**गृहनिर्माण विभाग**
**शासन शुध्दीपत्रक क्रमांकः प्रआयो/२०१७/प्र.क्र. १२ /गृनिधो-२/शिकाना**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक: २१ फेब्रुवारी, २०१८.

**वाचा -**

१) शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग क्र.प्रआयो/२०१७/प्र.क्र.१२/गृनिधो-२/शिकाना, दिनांक ११/१/२०१८

२) शासन परिपत्रक, गृहनिर्माण विभाग क्र.प्रआयो/२०१७/प्र.क्र.१२/गृनिधो-२/शिकाना, दिनांक २४/१/२०१८

**शुध्दीपत्रक-**

प्रस्तुत शासन निर्णय आणि त्यानुषंगिक मार्गदर्शक सूचना विचारात घेवून करावयाच्या कार्यवाहीची दिशा निश्चित करणे तसेच धोरणाची अंमलबजावणी करताना उद्भवणा-या समस्यांबाबत चर्चा करण्याकरीता मा.अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण) यांचेकडे दिनांक ०१/२/२०१८ रोजी सर्व संबंधितांची व्हिडीओ कॉन्फरन्स् आयोजित करण्यात आली होती. प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना सदर शासन निर्णयातील काही बाबींमुळे अडचणी उद्भवत असल्याचे संबंधितांनी चर्चेदरम्यान सांगितले. त्यानुषंगाने दिनांक ११/१/२०१८ रोजीचा शासन निर्णय आणि दिनांक २४/१/२०१८ रोजीचे परिपत्रक(मार्गदर्शक सूचना) यांमध्ये खालील बाबींचा समावेश/अंतर्भाव/सुधारणा करून शुध्दीपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.

अ) PPP धोरणांतर्गत प्रकल्पाच्या बांधकामाची गुणवत्ता दर्जेदार राहण्याच्या दृष्टीकोनातून स्थापत्य अभियांत्रिकी तज्ञ, तज्ञ वास्तुरचनाकार आणि बांधकाम तसेच लेखा/लेखापरीक्षण क्षेत्रातील तज्ञांची विभागनिहाय नामिकासूची (Empanelment) शासन स्तरावर तयार करण्यात येईल,

ब) प्रकल्प मंजुरीनंतर प्रकल्पाची नोंदणी महारेरा अंतर्गत करण्यात यावी,

क) दिनांक ११/१/२०१८ च्या शासन निर्णयातील परि.३(ब) खाजगी जमिनींवरील प्रतिकृतींसाठी अ.क्र.१ येथे योजनेत सहभागी होण्यासाठी उक्त जमिनीवर फक्त आर्थिकदृष्टया दुर्बल घटक/ अल्प उत्पन्न गटातील लाभार्थ्यांसाठीच घरकुले बांधणे आवश्यक राहील, असे नमूद केले आहे. त्याऐवजी आता, केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार AHP घटकांतर्गत खाजगी जमिनीवरील गृहप्रकल्पांमध्ये किमान ३५% घरकुले ही आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी राखीव असणे बंधनकारक राहील, असे वाचण्यात यावे,

ड) दिनांक ११/१/२०१८ रोजीच्या शासन निर्णयातील विवरणपत्र क्र.२ मध्ये ५ मिनीटे पायी अंतराऐवजी ०.५ कि.मी., १० मिनीटे पायी अंतराऐवजी १.० कि.मी., २० मिनीटे पायी अंतराऐवजी २.० कि.मी. तर बस/कारने १५ मिनीटे म्हणजे ५.० कि.मी. अंतर असे वाचण्यात यावे,

Scanned by CamScanner

इ) PPP धोरणांतर्गत गृहप्रकल्पांना महारेरा नियमातील तरतुदी लागू होणार असल्याने दिनांक ११/१/२०१८ च्या शासन निर्णयतील Performance Guarantee ची अट रद्द करण्यात येत आहे,

ई) दिनांक ११/१/२०१८ च्या शासन निर्णयातील परि.५ (ब) जमिनीची माहिती अंतर्गत अ.क्र.(१) जमिनीचे शिर्षक मध्ये निविदेच्या तारखेदिवशी जमीन संबंधित निविदाकार खाजगी विकासकाच्या नावे असणे आवश्यक राहील. तर फर्मच्या बाबतीत जमीन फर्मच्या नावावर असावी, असे नमूद केले आहे. त्याऐवजी आता PPP अंतर्गत गृहप्रकल्पांतील जमीन ही फर्म किंवा फर्ममधील किमान एका भागीदाराच्या नावावर असणे आवश्यक आहे, असे वाचण्यात यावे.

उ) दिनांक ११/१/२०१८ च्या शासन निर्णयातील परि. क्र.५(अ)(५) वगळण्यात येत आहे.

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे. त्याचा संकेताक २०१८०२२११६४२२०५४०९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ramchandra Dhanawade

Digitally signed by Ramchandra Dhanawade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Housing Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=cf4fd1e4249e6612552db1552e149b0688899cac7ecc37ca9fbf60ec7d9103d6, cn=Ramchandra Dhanawade
Date: 2018.02.21 16:44:45 +05'30'

**( रा.कों. धनावडे )**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१) मा.राज्यपालांचे सचिव,राजभवन, (पत्राने)
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
३) मा.मंत्री (गृहनिर्माण) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
४) मा.राज्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
५) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा, म. वि. स., विधानभवन, मुंबई.
६) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, म. वि. स., मुंबई
७) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२.
८) उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, गृहनिर्माण भवन,वांद्रे(पूर्व),मुंबई-५१.
९) व्यवस्थापकीय संचालक,शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
१०) मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, वांद्रे(पूर्व), मुंबई-५१.
११) मुख्य कार्यकारी अधिकारी, धारावी पुनर्वसन प्रकल्प, गृहनिर्माण भवन, वांद्रे(पूर्व),मुंबई-५१.
१२) संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई.
१३) निवडनस्ती/गृनिधो-२ कार्यासन, गृहनिर्माण विभाग,मंत्रालय, मुंबई-३२.



Scanned by CamScanner